# प्रसिद्धीपत्रक

## पॅलिएटिव्ह केअर म्हणजे काय?

पॅलिएटिव्ह केअर म्हणजे दीर्घकालीन, असाध्य किंवा जीवघेण्या आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेदनामुक्त आणि सन्मानपूर्ण जीवन देण्यासाठी दिली जाणारी एक समग्र आरोग्य सेवा होय. ही सेवा केवळ रुग्णालाच नाही, तर त्यांच्या कुटुंबालाही मानसिक आणि सामाजिक आधार देते.

**कोणाला या सेवेची गरज आहे?**

- कर्करोगाचे प्रगत टप्प्यातील रुग्ण
- अंतिम टप्प्यातील मूत्रपिंड, यकृत, हृदय, फुफ्फुस निकामी झालेले रुग्ण
- पक्षाघातानंतर कायमस्वरूपी अपंगत्व आलेले रुग्ण
- न्यूरोलॉजिकल आजार (Parkinson, Dementia, Muscular neuronal Dystrophy इ.)
- दीर्घकाळ मानसिक आजार असलेले रुग्ण (पॅलिएटिव्ह केअर आवश्यक असलेले)
- दीर्घकाळ अंथरुणावर असलेले रुग्ण HIV/TB चे प्रगत टप्प्यातील रुग्ण
- जन्मजात गंभीर आजार असलेली मुले

**मिळणाऱ्या मुख्य सुविधा:**

**घरोघरी भेट:** वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी (MO/ ANM/ ASHA) घरी येऊन तपासणी व उपचार करतील.

**वेदना नियंत्रण:** औषधांच्या माध्यमातून वेदना आणि इतर त्रासांपासून सुटका.

**साहित्य पुरवठा:** गरजेनुसार ड्रेसिंग साहित्य, यूरिन कॅथेटर, फिडिंग ट्यूब इत्यादींची मदत.

**समुपदेशन:** रूग्ण आणि नातेवाईकांना मानसिक बळ देण्यासाठी मार्गदर्शन.

**बाह्यरुग्ण सेवा:** कमला नेहरू रुग्णालय येथे रुग्णांच्या सर्वांगीण उपचारांसाठी फिजिशियन, मानसोपचार तज्ञ आणि फिजिओथेरपिस्ट या तज्ञांमार्फत सेवा दिली जात आहे.

**आंतररुग्ण सेवा:** कमला नेहरू रुग्णालय येथे वैद्यकीय कक्ष स्थापन केला असून पुरुष व स्त्रियांसाठी प्रत्येकी ५ असे १०बेड आरक्षित केले आहेत.

तुमच्या कुटुंबात किंवा परिसरात असाध्य आजाराने त्रस्त रुग्ण आहेत का? आता काळजी करू नका! महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत ९ फेब्रुवारी २०२६ पासून पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रम राबविण्यात येत असून पुणे महानगरपालिकेत सुद्धा सदर कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

☑ **आमचे उद्दिष्ट :-** रुग्णाला वेदनामुक्त करणे आणि जीवनाचा दर्जा सुधारणे.

☑ **आमची सेवा :-** तज्ञ डॉक्टरांचा सल्ला, घरबसल्या परिचर्या आणि मोफत औषधोपचार.

**अधिक माहितीसाठी संपर्क साधा:**
तुमच्या जवळचे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा जिल्हा रुग्णालय.
साथ-साथ टोल फ्री क्र.: १८००-२०२-७७७७
टेलिमानस (मानसिक आधार): १८००-८९-१४४१६

Vaishali 7/4/26

(डॉ. वैशाली जाधव)
ऑफिस इन्चार्ज MSU तथा
सहाय्यक आरोग्य अधिकारी,
साथरोग नियंत्रण विभाग
पुणे महानगरपालिका

(डॉ. निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका